आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३ वाजता

१४ जून २०२४ - शुक्रवार

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज इटलीमध्ये विविध देशांच्या प्रमुखांशी द्विपक्षीय चर्चा करणार आहेत. G-7 परिषदेसाठी ते इटलीला गेले आहेत. तिसऱ्यांदा प्रधानमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर मोदी यांचा हा पहिलाच परदेश दौरा आहे.

<><><><><>

१८व्या लोकसभेच्या सभापतीपदासाठी येत्या २६ जूनला निवडणूक होणार आहे. संसदेचं पहिलं अधिवेशन २४ जून ते ३ जुलै या कालावधीत होणार असून या अधिवेशनात नवनिर्वाचित खासदारांना सदस्यत्वाची शपथ देण्यात येईल. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू संसदेच्या दोन्ही सभागृहांना संयुक्तपणे संबोधित करतील. राज्यसभेचं अधिवेशन २७ जूनपासून सुरु होणार आहे.

<><><><><>

वैद्यकीय आणि दंत वैद्यकीय प्रवेशासाठीच्या नीट परीक्षेत पेपरफुटी आणि अन्य गैरप्रकार झाल्याचा आरोप करत त्याची चौकशी केंद्रीय अन्वेषण संस्थेमार्फत करण्याची मागणी करणाऱ्या विविध याचिकांवर सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रीय परीक्षा संस्था तसंच केंद्र सरकारला नोटिसा बजावल्या आहेत. न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या सुट्टीकालीन पीठाने सीबीआय आणि बिहार राज्यसरकारकडूनही जबाब मागितला असून त्याकरता दोन आठवड्यांची मुदत दिली आहे. नीट परीक्षेत पेपरफुटीचा आरोप करत त्याची सीबीआय चौकशी करण्याची मागणी करणाऱ्या याचिका देशातल्या विविध उच्च न्यायालयांमधे दाखल झाल्या आहेत. त्यांची एकत्रित सुनावणी घ्यावी अशी विनंती राष्ट्रीय परीक्षा संस्थेनं केली होती. त्यावर न्यायालयाने याचिकाकर्त्यांना आपलं म्हणणं मांडायला सांगितलं आहे. पुढची सुनावणी येत्या ८ जुलैला होणार आहे.

नीट परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या हितरक्षणासाठी केंद्रसरकार बांधील असल्याचं केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी सांगितलं आहे. नीट परीक्षेतल्या कथित घोटाळ्यांसदर्भात सर्व वस्तुस्थितीची सर्वोच्च न्यायालयाने दखल घेतली असून न्यायालयाच्या निर्देशांनुसार सरकार विद्यार्थ्यांच्या हिताचं रक्षण करील असं प्रधान यांनी समाजमाध्यमावर लिहीलेल्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

विधान परिषदेच्या कोकण विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी सिंधुदुर्ग जिल्ह्यातून १८ हजार ५५१ मतदारांची अंतिम मतदार यादी निश्चित करण्यात आली आहे. जिल्ह्यात मतदार संख्या वाढल्यामुळे मतदान केंद्र २१ वरून ३१ इतकी निश्चित करण्यात आली आहेत. येत्या २६ जून रोजी पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी मतदान होणार आहे.

**<><><><><>**

पाच दिवसांच्या वार्षिक हज यात्रेला आजपासून सुरुवात झाली. या यात्रेसाठी जगभरातून सुमारे २० लाख यात्रेकरू सौदी अरेबियात मीना इथं एकत्र जमले आहेत. यात एक लाख ७५ हजार भारतीय यात्रेकरूंचाही समावेश आहे आणि यातले १ लाख ४० हजार २० यात्रेकरू भारतीय हज समितीच्या माध्यमातून यात्रेसाठी गेले आहेत.

**<><><><><>**

येत्या २१ जून रोजी दहावा आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा होणार आहे. या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी त्रिकोणासन करतानाचा व्हिडियो समाज माध्यमावर प्रसारित केला आहे. हे आसन कसं करावं याची माहिती त्यात प्रधानमंत्र्यांनी दिली आहे.

<><><><>

आयपीएल क्रिकेट सामन्यांचं अनधिकृत प्रसारण केल्याबद्दल तसंच क्रिकेट सामने आणि लोकसभा निवडणुकीच्या निकालावर सट्टा लावल्याबद्दल सक्तवसुली संचालनालय अर्थात इडीनं काल मुंबईत ऑनलाईन ॲपच्या कार्यालयावर छापे टाकले. या छाप्यात इडीनं रोख रक्कम, महागडी घड्याळं आणि डीमॅट खाती असे एकंदर ८ कोटी रुपये जप्त केले आहेत.

<><><><>

रत्नागिरी जिल्ह्यातल्या अणुस्कुरा घाटात काल रात्री दरड कोसळल्यामुळे हा मार्ग बंद झाला होता. दरड हटवण्यासाठी राजापूर सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी, कर्मचारी आणि पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून जेसीबीच्या साह्याने दरड बाजूला हटवण्याचं काम सुरू आहे. या मार्गावरून आता एका बाजूने दुचाकी वाहनांची वाहतूक सावधगिरीनं सुरू करण्यात आली असून, मोठ्या वाहनांनी आंबा घाटाच्या पर्यायी मार्गाचा वापर करावा असं आवाहन करण्यात आलं आहे.

<><><><>

मुंबई अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पात स्वयंचलित पर्जन्यमान मापक वापरण्यात येणार आहे. बुलेट ट्रेन अधिक अधिक सुरक्षित करण्यासाठी ही प्रणाली वापरण्यात येणार असून यामध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरून पावसाची अचूक नोंद ठेवता येईल. या प्रणालीत नोंदवलेल्या पावसाच्या प्रमाणानुसार मध्यवर्ती सिग्नल नियंत्रक प्रणाली काम करणार आहे.

//<><><><>//